स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील

पीएच.डी पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

:-संशोधन शीर्षक:-

“सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार व कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन”

:-संशोधक:-

कांबळे भैय्या संतराम

एम.ए. (राज्यशास्त्र) एम.फिल.

लातूर.

:-मार्गदर्शक:-

प्रा. डॉ. पाटील. एस. जी

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

2019

प्रस्तावना:

भारतीय समाजव्यवस्था ही प्रारंभी वर्ण आणि नंतर जातीच्या आधाराने स्तरीकरण झालेली व्यवस्था आहे. वर्ण व जातीतील साचेबंदपणामुळे विषमता, अन्याय, अत्याचार गुलामगिरी अशा अमानवी गोष्टीना प्रचंड स्वरुपात महत्व आले. या अमानवी व्यवस्थेचे संपुष्ठीकरण करण्यासाठी सामाजिक आंदोलनाची निर्मिती ही झाली परंतू क्वचित स्वरुपात राज्य व्यवस्थेकडून समता, जातीविहीत समाज, सामाजिक न्याय या मुल्यांना बळकटी देण्यासाठी प्रयत्न झाले. भारताच्या राजकीय इतिहासावर दृष्टिक्षेप टाकल्यास हे स्पष्ट होते की बडोद्यांचे सयाजीराव गायकवाड यांची राजकीय व्यवस्था मानवी व लोकशाही मुल्यांच्या प्रस्थापणेसाठी स्वातंत्र्यपुर्व काळात प्रयत्न करित होती. ज्यामुळे समतावादी समाज रचनेची बांधणी होऊ शकली.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये अनेक संस्थाने ही होते. या संस्थानामधील समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर अवलंबून होती.वर्णव्यवस्थेच्या विचारातूनच जाती व्यवस्थेची जडण-घडण झाली व जात ही एक साचेबंद व्यवस्था जी भारतीय समाजाचे वैशिष्ट्य बनले.भारतीय समाज हा अनेक वेगवेगळ्या जातीनी बनला आहे.त्यामुळे समाजात समते ऐवजी विषमता ही मोठ्या प्रमाणात दिसत असे. समाजात निर्माण झालेली ही विषमता दूर करण्याचे काम स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये प्रामुख्याने बडोद्याचे राजा सयाजीराव गायकवाड व कोल्हापूरचे महाराजा शाहू महाराज यांनी केले.

एकोणीसाव्या शतकात भारतात चातुर्वर्ण्य, जातीभेद, सरजामशाही या वाईट रीतीचे अधिराज्य होते. दलित, आदिवासी, भटके विमुक्त हे सर्वच अन्याय, अस्पृश्यता, दास्य अज्ञान यात खितपत पडले होते.भारतीय समाजाला कलंक असलेल्या अस्पृश्यता निवारणाचे कार्य निरनिराळया समाजसुधारकांनी केले होते. तरीही या सर्वांपेक्षा अतिशय निष्ठेने, स्वानुभवाच्या आधारावर अस्पृश्यांना गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी जागृत व संघटीत करण्याचे शिक्षणाच्याव्दारे त्यांच्यात नवनवीन विचाराचा प्रसार करण्याचे व आत्मसन्मानाचा नविन मार्ग दाखविण्याचे कार्य सयाजीराव गायकवाड यांनी केले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विषमताही अधिक प्रमाणात असल्याने त्या ठिकाणी अस्पृश्यांना मंदिरात जाण्याचा अधिकार, सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा, शाळेत जाऊन शिक्षण घेण्याचा अधिकार असे कोणतेही अधिकार

नव्हते. तेंव्हा सयाजीराव गायकवाड यांनी या अस्पृश्यांना सामाजिक प्रवाहात आणले व त्यांना इतराप्रमाणेच वागणूक दिली.

सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांना आपल्या कायदे मंडळात आरक्षण दिले त्याच बरोबर त्यांच्यासाठी शाळा व वसतीगृहे काढली. ज्याप्रमाणे शाहू महाराजांनी संस्थानातील नोकऱ्यामध्ये मागासलेल्या जातिजमातीसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय २६ जुलै १९०२ रोजी घेऊन प्रत्यक्ष अमलात आणण्यास सुरुवात केली.

समतेविषयी म्हणत असताना बाबासाहेब म्हणतात. "समतावाद्यांचे खरे ध्येय सर्वांना सारखे वागविणे हे नसून समता प्रस्थापित करणे हे आहे."

गांधीजींच्या मते समता म्हणजे "माणसा माणसांतील निर्जीव एकरुपता आणि सारखेपणा नव्हे, आपण सर्व ईश्वराची लेकरे आहोत म्हणून समान आहोत. असे गांधी वारंवार म्हणत पण ते तेथेच थांबले नाहीत त्याही पुढे जाऊन सर्व मानव मात्र जन्मत: समान आहेत याचा अर्थ सर्व माणसांना समान संधीचा हक्क आहे असे गांधी म्हणत."

गांधीच्या मते जन्मत: सर्व समान आहे तर ऐवढ्या मोठ्या प्रमाणात आजही जाती व्यवस्था दिसून येते. आजही ग्रामीण भागामध्ये दलित समाजातील व्यक्तीला मंदिरात प्रवेश दिला जात नाही ही विषमता आजच्या २१ व्या शतकात दिसून येते हीच मोठी शोकांतिका आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ ते १८ मध्ये दिलेल्या समतेच्या अधिकार हा प्रामुख्याने भारतातील जातीयता संपूष्टात आणण्यासाठी करण्यात आलेला आहे. परंतू आजही जातीयवादाच्या घटना समाजात घडून येत आहेत. त्यामुळे या राजांनी मांडलेले विचार व त्यांच्या कार्याचा अभ्यास त्या दृष्टिकोनातून महत्वाचा आहे.

सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यता निर्मूलना बरोबरच स्त्रीयांच्या शिक्षणाचा प्रश्न हा मार्गी लावला त्यांना शिक्षण देवून त्यांना उद्योगधंद्याचे प्रशिक्षण त्यांनी दिले, त्याच बरोबर स्त्रीयावर लादलेल्या अनिष्ठ रुढी, परंपरा यांना मुठमाती देण्याच कामत्यांनी केले.

स्त्रीही पुरुषा इतकीच मेहनती आहे त्यामुळे तिला पुरुषा पेक्षा कमी न लेखता पुरुषाबरोबर त्यांना लेखले व स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला.त्यामुळे सयाजीराव गायकवाड यांचे विचार आजही तितकेच महत्वाचे आहेत.

आजच्या २१ व्या शतकात ही स्त्रीयांना हिन वागणुक दिली जाते. त्यांना एखाद्या गुलामाप्रमाणे घराच्या चार भिंतीत आपले जीवन व्यथित करावे लागते आहे. स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते. हे विचार बदलण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांच्या समते व त्याच्या विविध राजकीय कार्याचा अभ्यास करुन त्या विचारांची आजच्या दृष्टिकोनातून असलेली प्रस्तुतता मांडली गेली पाहिजे या विचारातूनच त्यांचे विचार मांडत आहोत.

स्वातंत्र्य पूर्व कालखंडामध्ये सामाजिकसुधारणा अगोदर की राजकीय सुधारणा या संबंधीचा वाद आगरकर आणि टिळक यांच्या मध्ये होता. परंतु प्रत्यक्षात राजकारणाव्दारे सामाजिक सुधारणा शक्य आहे. याचा प्रत्येय देत राजकीय आणि सामाजिक सुधारणा एकत्र करता येतात याचे उदाहरण महाराष्ट्रात राजर्षी शाहू महाराजांनी तर बडोदा संस्थानात सयाजीराव गायकवाड यांनी दाखवून दिले. भारतीय राजकीय विचार परंपरेत सयाजीराव गायकवाड यांचा एक कृतीशील राजकीय विचारवंत म्हणून फारसा विचार केला गेला नाही. त्यामुळे आधुनिक कालखंडात लोकशाहीवादी मुल्यांचा पुरस्कार करणाऱ्या सयाजीराव गायकवाडांचा अभ्यास केला जावा या उद्देशाने मी "सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार व कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन" विषयावर संशोधन करण्याचे निश्चित केले आणि सदरील विषय निवडला.

समस्यासुत्रण :

"सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार व कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन" हा विषय घेऊन शोध प्रबंधाची मांडणी करण्यात आली आहे. भारतीय समाज हा चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारलेला आहे. स्पृश्य-अस्पृश्यता प्राचीन काळापासुन अस्तित्वात आहे. त्यामुळे समाजात विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना जातीव्यवस्था सामाजिक विषमता या सारख्या वाईट प्रथा होत्या. जाती व्यवस्था, स्त्रीयावरील अन्याय नष्ट करण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केला. अस्पृश्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले. परंतु सयाजीराव गायकवाड यांनी जाती निर्मुलनासाठी, स्त्री पुरुष समता प्रस्थापित करण्यासाठी अस्पृश्यांना त्यांना शिक्षणाचा व समाजात मान प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी ही ठरला.

पण आजही दलितांना अन्याय अत्याचाराला बळी पडाव लागत आहे. स्त्रीयांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात येत आहे. त्यांना योग्य तो न्याय आजही मिळत नाही. त्याला जबाबदार आहे ते शासन व्यवस्था सयाजीराव

गायकवाड यांनी केलेल्या मोलाच्या कार्याचे अध्ययन करुन त्यांच्या कार्याला सर्वांसमोर आणण्यासाठी हा विषय निवडला.

बडोदा संस्थान हे युरोपीय आधुनिक प्रशासन नीतीची बरोबरी करणारे प्रागतिक राज्य म्हणून ओळखले जाई. संस्थानातील सक्तीचे प्राथमिक शिक्षण, अस्पृश्यता बंदी, स्त्री-शिक्षण व सामाजिक सुधारणा सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा पंचायत राज्याचा प्रयोग हे भारतातचा नव्हे तर युरोपातही चर्चेचेविषय झाले.

विठ्ठल रामजीशिंदे, शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांना शिक्षणाची सोय केली. त्यांनीही सामाजिक विषमता व जाती व्यवस्था नष्ट करुन समतेचा पुरस्कार केला आहे.

सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांना शिक्षण देऊन त्यांच्यात न्याय हक्काची जाणीव निर्माण करुन देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणातून जाती निर्मुनाचा विचार मांडला. त्यांनी लोकशाही प्रणालीचा स्विकार केला एकूणच त्यांचे मुख्य कार्य समता प्रस्थापित करणे हा आहे.

सामाजिक विषमता नष्ट करुन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला समाजात जी विषमता होती त्याबद्दल त्यांना चिड होती स्पृश्य लोक हे अस्पृश्यांना हीन समजत असत, त्यांना मंदिर प्रवेश नाकारत असत. त्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास मनाई असे. त्यांनी स्वत: मंदिराचे दारे अस्पृश्यांसाठी उघडली ही किमया सयाजीरावांनी करुन दाखविली. पुरुषाच्या खंद्याला खंदा लावून स्त्रीयांचे आपले कार्य पार पाडू लागल्या.त्यांना रोजगाराची संधी त्यांनी उपलब्ध करुन दिली. एक योग्य प्रशासक कसा असावा याचे ज्वलंत उदाहरण म्हणून सयाजीराव गायकवाडांचा उल्लेख हा करावा लागेल.

आजच्या सद्य स्थितीला ही जाती व्यवस्था दिसून येते. त्याच बरोबर स्त्रीयांना पुरुषा ऐवढा वाव मिळताना दिसत नाही. फक्त भाषणात बोलण्या पलिकडे स्त्री-पुरुष समानता ही कोठेच दिसत नाहीत. दलितांचे होणारे अत्याचार, खून या समस्या आजही तोंड आ वासून उभे आहेत. यावर प्रशासन मात्र हाताची घडी तोंडावर बोट अशा प्रकारची भुमिका घेत आहे. म्हाणून ही जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी, स्त्रीयांना त्यांचा हक्क देण्यासाठी व समाजात समता प्रस्थापित करुन जाती व्यवस्थेचे उच्चाटन करण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांच्या विचारांची आजही गरज आहे. त्यांच्या समता विषयी विचारांची पुर्नमांडणी व्हावी म्हणून हा विषय निवडला आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे/उद्देश :

1) सयाजीराव गायकवाड यांचा राजकीय नेतृत्वाचा अभ्यास करणे.

2) लोक कल्याणकारी योजनांचा अभ्यास करणे.

3) सयाजीराव गायकवाड यांच्या विचार व कार्याची आजच्या काळातील आवश्यकता शोधणे.

4) लोक कल्याणकारी राजकारणाचे अध्ययन करणे.

5) दुरद्रष्टा राजा म्हणून अभ्यासणे.

6) सयाजीराव गायकवाड यांचे जीवन व कार्याचा अभ्यास करणे.

7) स्वातंत्र्यपूर्व समाज स्थितीचे स्वरुप जाणून घेणे.

8) भारतीय समाजातील स्त्रीयांचे स्थान व त्यांचे बदलते स्वरुप याचा अभ्यास करणे.

9) भारतीय संविधानातील समता मुल्यांचे आणि सयाजीराव गायकवाड यांच्या समता विचारांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

10) सयाजीराव गायकवाड यांचा क्रिडा विषयक दृष्टीकोन तपासणे.

11) सयाजीराव गायकवाड यांच्या लोक प्रबोधन पर उपक्रमाची माहिती घेणे.

12) सयाजीराव गायकवाड यांचे पुरोगामी शिक्षण विषयक धोरणाचा अभ्यास करणे.

अध्ययनाची व्याप्ती :

1) तत्कालीन भारताच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय परिस्थितिचा अभ्यास करणे.

2) सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या कल्याणकारी कार्याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके :

1) सयाजीराव गायकवाड यांच्यावर उदारमतवादी विचारसरणीचा प्रभाव होता.

2) सयाजीराव गायकवाड यांनी आरक्षण धोरणास गतिमान केले.

3) सयाजीराव गायकवाड हे स्त्री-पुरुष समतेचे कृतीशील पुरस्कर्ते होते.

4) सयाजीराव गायकवाड यांच्या समता विषयक विचारांनी भारतीय संविधानास प्रभावित केले.

5) सयाजीराव गायकवाड यांनी समताधिष्ठित समाजाची निर्मिती केली.

6) आजच्या राजकीय अव्हांनाना व लोकशाही सक्षमी करणासाठी सयाजीराव गायकवाड यांचे विचार व कार्य प्रासंगिक आहे.

7) सयाजीराव गायकवाडांच्या राजकीय कार्यातून लोककल्याणकारी राज्याचा उदय झाला.

8) अर्थकारणास गतीमान केले.

9) शेतीला उद्योगधंद्याची जोड दिली.

तथ्य संकलनाच्या पध्दती :

संशोधकाच्या संशोधनाचे यश हे संशोधन विषया संबंधी आवश्यक तथ्य संकलनावर अवलंबुन असते. संशोधकास संशोधन करताना अचुक, विश्वसनिय तथ्य संकलन करणे हे सर्वात महत्वाचे कार्य पुर्ण करावे लागते. तथ्य संकलन अचुक असेल तरच संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष अचुक ठरु शकतात. तथ्य संकलन ही एक दीर्घ विस्तृत अशी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत तथ्य संकलनाचे तंत्र व कार्य पध्दतीला विशेष महत्व आहे. कारण या वरच तथ्यांची परिशुध्दता व निष्कर्षाची सत्यता अवलंबुन असते.

तथ्य संकलन करण्याच्या प्रामुख्याने पुढिल दोन पध्दती आहेत.

1) प्राथमिक तथ्य संकलन पध्दती.

2) व्दितीयक तथ्य संकलन पध्दती.

1) प्राथमिक स्त्रोत : -

सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा येथील कार्यस्थळांचे निरिक्षण करणे, त्याच बरोबर तत्कालीन साहित्याचे वाचन आणि निरिक्षण करणे. सयाजीराव गायकवाड यांच्यावर ज्यांचा अभ्यास आहे अशा अभ्यासकांच्या मुलाखती घेणे. तसेच प्रश्नावलीव्दारे तथ्य संकलन करणे.

2) दुय्यम स्त्रोत :

प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ साहित्य व नियतकालकांचा वापर करुन तथ्य संकलन करणे. दुय्यम स्त्रोतामध्ये प्रामुख्याने सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, जीवन चरित्र यांचा अभ्यास करुन तथ्य संकलन करणे.

अध्ययन पध्दती :

“सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार व कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन” या विषयाचा अभ्यास करत असताना दुय्यम स्त्रोतांचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले व त्या अनूषंगाने ऐतिहासिक विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक पध्दतीने तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

संशोधन विषयाचे महत्व :

स्वतंत्र भारताने लोकशाहीवादी शासन व्यवस्थेचा स्विकार करुन स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्म निरपेक्षता, व्यक्ती, प्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता या मुल्यांना प्राधान्य दिले आहे. समकालीन जगात मानवी हक्कांना आलेले महत्व तथा व्यक्तीकेंद्रित राज्याची कल्पना त्यामुळे समतावादी समाज रचनेस आग्रस्थान दिले जात आहे. या पार्श्वभुमीवर स्वातंत्र्यपुर्व कालखंडात समतावादी चळवळीचा राजकीय इतिहास अभ्यासणे क्रमप्राप्त ठरते. तसेच भारतातील संस्थानिकाव्दारे संस्थानाच्या अंतर्गत राबवण्यात आलेल्या लोक कल्याणकरी योजना, समता प्रस्थापणेसाठी केलेले प्रयास यांचा अभ्यास करुनच स्वतंत्र भारतातील भारतीय राज्यघटना, समाज व्यवस्था, मुल्य व्यवस्था आणि राज्य व्यवस्थेचे खरे मुल्यमापन केले जाऊ शकते.

सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात कृषी व उद्योग यांना खुप महत्व दिलेले दिसुन येते. त्यामुळे बडोदा संस्थान हे अर्थिक दृष्ट्या सक्षम असल्याचे अपणास दिसुन येते. महाराजांनी शेतीला जोड धंदा असेल तर शेतकरी हा कर्जबाजारी न होता अर्थिक सक्षम बनेल असे म्हटले आणि त्यांनी ते करुन हि दाखवले. सयाजीराव गायकवाड यांचे कार्य तेव्हाही सक्षम होते आणि आज सद्यस्थितीला ही ते तितकेच महत्वाचे हि आहे. महाराजांनी उद्योगांना चालना देवुन बडोदा संस्थानाला आर्थिक दृष्ट्या सक्षम केले. म्हणुन बडोदा संस्थानाला अर्थिक गती मिळाली एकुणच सयाजीराव गायकवाड यांचा सामाजिक, राजकिय व अर्थिक दृष्टीने विचार व्हावा. या दृष्टीनेच "सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार व कार्याचे विश्लेषणात्मक अध्ययन" या विषयाचे संशोधन महत्वपूर्ण ठरते.

अनुक्रमणिका

प्रकरण पहिले - प्रस्तावना व विषय प्रवेश

1.1 प्रस्तावना

1.2 समस्यासुत्रण

1.3 अभ्यासाची उद्दिष्टे/ उद्देश

1.4 व्याप्ती

1.5 गृहितके

1.6 तथ्य संकलनाच्या पध्दती

1.7 अध्ययन पध्दती

1.8 संशोधन साहित्याचा आढावा

1.9 अध्ययनाचे महत्व

1.10 संशोधन आराखडा

प्रकरण दुसरे - सयाजीराव गायकवाड यांचे जीवन चरित्र

2.1 कौटुंबिक पार्श्वभुमी

2.2 जन्म, बालपण व शिक्षण

2.3 दत्तक विधान

2.4 विवाह

2.5 कौटुंबिक परिचय

प्रकरण तिसरे - सयाजीराव गायकवाड यांच्या सामाजिक विचारांचे अध्ययन

3.1 दलित समाजा संबंधीचे विचार

3.2 स्त्री सुधारणा संबंधीचे विचार

3.3 अस्पृश्यता संबंधीचे विचार

3.4 हिंदु-मुस्लिम ऐक्याचा विचार

3.5 पंक्ती भेद दुर करणे

प्रकरण चौथे - सयाजीराव गायकवाड यांचे राजकीय विचाराचे अध्ययन

4.1 धर्म विषयक विचार

4.2 कायदे विषयक विचार

4.3 समते विषयक विचार

4.4 ब्रिटिश सरकार सोबतचे संबंध

4.5 शेजारी संस्थाना बाबतची भुमिका

4.6 परदेश दौऱ्यातून संस्थानाचा विकास

प्रकरण पाचवे - सयाजीराव गायकवाड यांचे आर्थिक कार्याचे अध्ययन

5.1 औद्योगिकरणा संबंधीचे विचार

5.2 कृषी धोरणा संबंधीचे विचार

5.3 सहकार संबंधी विचार

5.4 आर्थिक सक्षमीकरण

5.5 अन्न-धान्या बाबत विचार

5.6 व्यापार विषयक विचार

5.7 बडोदा बँक

5.8. ग्रामिण उद्योग

प्रकरण सहावे - समारोप आणि निष्कर्ष

संशोधनाची उद्दिष्टे आणि गृहितके यांना केंद्रभूत मानून आणि सयाजीराव गायकवाड यांच्या समग्र विचाराचे अध्ययन केल्यास निघणारे निष्कर्ष नोंदविली जातील.

संदर्भ सूची

१) प्रा. नानासाहेब साळुंके, शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर,एप्रिल, २००८.

२) डॉ. रावसाहेग कसबे (संपा), समता : विचार, व्यवहार, भवितव्य, दादासाहेब रुपवते फाऊंडेशन मुंबई, जुलै २०००.

३) बाबा भांड, युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१२.

४) स्मिता भागवत/ अविनाश कप्तान, इये सयाजी चिये नगरी , मातृभुमी सेवा ट्रस्ट, मुंबई. २००४.

५) बाबा भांड, लोकपाल राजा सयाजीराव, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,२०१३.

६) आपटे दाजी नागेश, श्री महाराजा सयाजीराव गायकवाड(तिसरे), चरित्र खंड १, प्रकाशन खुद, बडोदे.

७) व्ही.के .चावडा,(अनु,सं.ग मालशे), सयाजीराव गायकवाड, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली, २००९.

८) सरदेसाई गो.स, श्री सयाजीराव यांच्या आठवणी, एस जगन्नाथ ॲन्ड कंपनी पुणे १९३३.

९) दांडेकर वि.पा. सयाजीराव गायकवाड, ग.ल. ठोकळ प्रकाशन, पुणे, १९५३

१०) महाबळ कृ.ब.,गरुवर्य, प्रो. माणिकराव यांचे चरित्र, नाशिक, १९५७

११) शिंदे नानासाहेब, एका शिपायाचे आत्मवृत्त, दामोदर सावळा ॲन्ड मंडळी, मुंबई,

१२) गायकवाड सयाजीराव, श्री मन्म महाराज सयाजीराव गायकवाड यांचे भाषणे, खंड १, दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई, १९३६.

१३) श्रीराम निकम, गांधी आंबेडकर :अस्पृश्यमुक्ती संघर्ष, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००८

१४) ज्योत्सना घारापुरे, अशा झुंजलो आम्ही, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९४.

१५) घाटे विठ्ठल दत्तात्रय, असे दिवस होते, मौज प्रकाशन, मुंबई, १९६१.

१६) गायकवाड सयाजीराव, श्री मन्म महाराज सयाजीराव गायकवाड यांचे भाषणे, खंड २, दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई, १९३७.

१७) डॉ. ज्ञानराज काशीनाथ गायकवाड, महामानव, राजवंश पब्लीकेशन मुंबई, २००७

१८) खैरमोडे चांगदेव भं., डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड १, सुगावा प्रकाशन, पुणे, १९५२.

१९) खैरमोडे चांगदेव भं., डॉ. भिमराव रामजी आंबेडकर, खंड ४, सुगावा प्रकाशन, पुणे, १९६८.

२०) बाबा भांड, सयाजीराव गायकवाड यांचे भाषणे, खंड १, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
२१) बाबा भांड, निवडक कायदे अर्थात हुजुर-हुकुम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
२२) मीरा चव्हाण, निर्देशित : स्त्री जीवन वेदना आणि संवेदना, प्रकाशन सोपान चव्हाण, कोल्हापूर, २०००.
२३) प्रा. अशोक नारनवरे, (लेख) भारतीय समाजधर्म आणि स्त्री भृणहत्या, महिला विकास, प्रश्न-पैलू प्रयास, संपा. डॉ. राजशेखर सोलापूरे, अरुणा प्रकाशन, लातूर, २०१२.
२४) बाबा भांड, सयाजीराव गायकवाड यांची भाषणे, खंड २, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २०१३.
२५) बॅ. सुनीती पुंगलिया, स्त्री आणि कायदा, वुईमेन्स फाऊंडेशन प्रकाशन (स्त्री प्रतिष्ठान), पुणे.
२६) पाटील रामचंद्र शामराव, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचा महाराष्ट्रातील सत्कार, सरकारी छापखाना, बडोदे, १९३३.
२७) रविंद्र, लाल कमल, श्री अरविंद सोसायटी, पाँडेचरी, १९८१.
२८) शर्मा बंसीधर, भारत मे क्रांतीकारी आंदोनल तथा सयाजीराव गायकवाड, पुस्तकालय देलही, १९९०.
२९) डॉ. निशांत सिंह, महिला विधी, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली, २००८.
३०) Government of Bombay, Source Material for a history of the freedom movement in india, Vol.II (1885-1920), Government Press, Bombay, 1958.
३१) Irawati karve, Hindu Society an Interpretation, Deccan College Pune, 1961.
३२) A.R. Desal, Social Background of Indian Nationalism, Popular Prakashan, Bombay, 1976.
३३) मुक्ता शंकरराव पेटकर, महिला आणि प्रसारमाध्यमे यांचा परस्पर संबंध, शोध संपदा (त्रैमासिक- नोव्हें. २०११ - जाने.२०१२) संपा. डॉ. राजशेखर सोलापूरे, लातूर.
३४) प्रा.कु. ज्याती मुंडे, महिला चळवळीत समाज सुधारकाचे योगदान, शोध संपदा, (त्रैमासिक - फेब्रू. - एप्रिल २०१४) संपा. प्रा.डॉ. राजशेखर सोलापूरे, लातूर.
३५) गुजरात समाचार, २४ ऑक्टे. २०१३.
३६) सकाळ, ९ फेब्रु., ३१ जुलै, २०१४.
३७) शोध संपदा (त्रैमासिक- ऑगस्ट- ऑक्टोबर, २०१३) संपा - प्रा. डॉ. राजशेखर सोलापूरे, लातूर.

मार्गदर्शक **संशोधक**

प्रा.डॉ. पाटिल एस.जी.
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर.

कांबळे भैय्या संतराम
एम. ए. (राज्यशास्त्र) एम.फिल
लातूर.

ठिकाण : लातूर

दिनांक : / /